महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसटीसी–३५९०/विएड/२८२९/विशि–२
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२
दिनांक: 10 सप्टें. १९९०.

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

C.E.O.
8
21/9/90

विषय: सन १९९०–९१ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी.

महोदय,

सन १९९०–९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करून छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझिनेस एज्युकेशन रिसर्च ट्रस्ट, कोल्हापूर या संस्थेच्या १९९०–९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | अध्यापक महाविद्यालय. |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे.

१. सदर महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यांत येत आहे.

२. शासन पत्र क्र. एसटीसी–२२८९/[१८८८] विशि–२, दि. २२. ६. १९९० मध्ये खाजगी अध्यापक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दत अनुसरण्यांत यावी.

३. सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास सदर महाविद्यालये रू. २,५००/– शिक्षणशुल्क आकारतील विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर अध्यापक महाविद्यालयातून पालन करण्यांत यावे.

४. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल

SIBER, KOLHAPUR.
Inward No. 1215
Date 22-9-90
Directed to ........
Remarks ........
Principal OS. Clerk.

. . २/. .

. . २/. .

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक [उ. शि.] महाराष्ट्र राज्य, पुणे
२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान]
३] सचिव, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च ट्रस्ट, कोल्हापूर
४] निवड नस्ती.